**प्रेस नोट** **दिनांक ०५/०४/२०२६.**

**‘‘ पवई पोलीस ठाणेकडुन मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरातुन गॅस सिलेंडर चोरी करणा-या सराईत आरोपीस अटक करून ४५ गॅस सिलेंडर व चोरीच्या ०३ मोटार सायकल हस्तगत केलेबाबत ’’**

पवई पोलीस ठाणे मुंबई येथे मोटार सायकल चोरीचा गुरक्र. ७१४/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेली या Suzuki Burgman MH ०१ EL- ३७८४ या मोटार सायकलचा वापर करुन एक इसम मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरात वेगवेगळया ठिकाणी गॅस सिलेंडर चोरी करत असल्याचे निष्पन्न झाले होते. नजीकच्या काळात पवई पोलीस ठाणे हद्दीत गॅस सिलेंडर चोरीचे ०२ गुन्हे नोंद करण्यात आले होते. सध्याच्या आखाती देशातील युध्दाच्या पार्श्वभुमीवर समाजातील सर्व स्तरातील लोक गॅस सिलेंडर बाबत चिंतीत असताना सदर चोरीमुळे आणखी त्रस्त होऊ नये याकरीता दाखल गुन्हयाचा लक्षपुर्वक व शीघ्रतेने तपास करण्याकरीता गुन्हे प्रकटीकरण पथकाचे दोन पथके तयार करण्यात आली होती.

सदर पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार यांचे मार्फतीने राज चंद्रकांत कांबळे वय ४५ वर्षे रा.ठि. वर्तक नगर, ठाणे, यास ठाणे परिसरातुन ताब्यात घेवुन त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हे करण्यासाठी चोरी करून वापरलेल्या ०३ मोटार सायकल हस्तगत करण्यात आल्या असुन मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरातून चोरी केलेले एकूण ४५ गॅस सिलेंडर हस्तगत करण्यात आले. चोरी केलेले सिलेंडरची विल्हेवाट लावण्याकरीता त्यास मदत करणारे ०२ आरोपींवर देखील कारवाई करण्यात आले आहे. सदर आरोपी सराईत असून त्याच्यावर चोरीचे एकूण १० गुन्हे असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**आरोपीताकडून उघडकीस आलेले गुन्हे खालील प्रमाणे आहे.**

१) पवई पोलीस ठाणे, गुरख ७१४/२०२४ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.
२) पवई पोलीस ठाणे, गुक्र. २४०/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.
३) पवई पोलीस ठाणे, गुरक्र. ३१४/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.
४) शिवाजी पार्क पोलीस ठाणे, गुरक्क्र. १३६/२०२६ कलम ३०३(२) भा.न्या.सं.
५) कामोठे पोलीस ठाणे, नवी मुंबई गुरक्क्र. २२३/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.,
६) पार्क साईट पोलीस ठाणे, गुक्र २६५/२०२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं.

**पवई पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मुंबई, नवी मुंबई व ठाणे परिसरातुन आरोपीतास शिताफिने अटक करून त्याचेकडून ०३ मोटार सायकल व ४५ गॅस सिलेंडर हस्तगत करून वर नमुद प्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई श्री देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री. सत्यनारायण, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. परमजित सिंह दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, श्री दत्ता नलावडे, परिमंडळ १०, मुंबई व सहायक पोलीस आयुक्त साकीनाका विभाग, मुंबई श्री. प्रदिप मैराळे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पवई पोलीस ठाणे, मुंबई श्री. जितेंद्र सोनवणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. संजय बंडगर यांचे प्रत्यक्ष देखरेखीखाली सपोनि संतोष कांबळे, पोउपनि गणेश आव्हाड, पोह. तानाजी टिळेकर, पोह. मारोती सुरनर, पोह. आदित्य झेंडे, पोह, जयदेव चव्हाण, पोह, रमेश नलावडे, पोह. संदीप सुरवाडे, पोह विशाल पिसाळ (तांत्रिक मदत) पोशि. सुर्यकांत शेट्टी, पोशि, सदाशिव वारंग, पोशि. संदीप राठोड, पोशि. अर्जुन राठोड, पोशि. प्रदिप शिरसाट यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.